# ७. मानवी वस्ती

हवामानातील भिन्नता, पाण्याची उपलब्धता, जमिनीचा उतार व सुपीकता यामुळे वस्त्यांच्या रचनेत विविधता आढळते. जेथे पाण्याची मुबलकता, सुपीक जमीन असेल तेथे मानवी वस्ती जास्त असते. उदा . उत्तर भारतीय मैदानी प्रदेश, पूर्व, किनारपट्टी, नर्मदेचे खोरे या ठिकाणी केंद्रित वस्त्या आढळतात.

जेथे डोंगराळ भाग, वनाच्छादित भाग, वाळवंट, उंचसखल प्रदेश आहे, तेथे मानवी वस्ती विरळ व विखुरलेली असते.

ब्राझीलमध्ये सुरुवातीच्या वस्त्या युरोपमधून आलेल्या वसाहतवाद्यांच्या आहेत. या वस्त्या तेथील ब्राझीलच्या किनारी प्रदेशात झाल्या. आता या वस्त्या विकसित झाल्या आहेत, कारण किनारपट्टीचे सम व दमट हवामान, मुबलक पाणी, भरपूर साधनसंपत्ती, शेतीपूरक जमीन इ. मुळे येथे दाट वस्ती आहे. उदा. सावो पावलो येथील प्रदेश सुपीक जमिनीचा आहे. कॉफी उत्पादन खूप होते. खानिजाचा साठा मुबलक, ऊर्जेचा मुबलक पुरवठा, वाहतूकीच्या सोयी त्यामुळे तेथे मानवी वस्ती केंद्रित झालेली आहे.

ब्राझीलच्या ईशान्य भागातील उच्चभूमीचा प्रदेश अवर्षणग्रस्त आहे. त्यामुळे येथे शेतीचा विकास कमी म्हणून या भागात वस्त्याही विखुरलेल्या व विरळ आहेत. ब्राझीलच्या अंतर्गत भागात ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात मानवी वस्त्या अधिक विरळ होताना दिसतात. कारण तेथील प्रदेश घनदाट विषुववृत्तीय वनाने व्यापलेला आहे. हवामान रोगट आहे. साधनसंपत्तीचा शोध व वापर ही मर्यादित आहेत. वाहतुकीच्या सोई अतिशय मर्यादित आहेत. त्यामुळे तेथे विरळ मानवी वस्ती आहे.

**भारत – नागरीकरण :**

भारतातील नागरीकरणाचा वेग कमी आहे. तरी नागरी लोकसंख्येत वाढ होत आहे. भारतात उत्तरेच्या तुलनेत दक्षिणेकडे नागरीकरण जास्त झालेले आहे. उदा. गोवा, सर्वाधिक नागरीकरण येथे झाले आहे. दिल्ली, तामिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात, केरळ तर हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, उत्तराखंड, बिहार, राजस्थान या राज्यात नागरीकरण कमी झाले आहे.

**ब्राझील नागरीकरण :** या देशाच्या नागरीकरणाची प्रक्रिया वैशिष्ट्यपूर्ण आहे. ९६% लोकसंख्या शहरी भागात राहते. ब्राझील मधील ‘सावो पावलो’ या महानगरात आणि औद्योगिक प्रदेशात नागरिकरणाची वाढ सर्वाधिक आहे म्हणून ब्राझील सरकारने ‘पश्चिमेकडे चला’ असे हे धोरण राबवायचे ठरवले आहे. त्यामुळे काही भागातच होणारे नागरीकरण कमी होऊन लोकसंख्येचे विकेंद्रीकरण होईल व देशातील

लोकसंख्या वितरणातील असमतोल कमी होईल. ब्राझील मधील नागरीकरण अंतर्गत भागापेक्षा किनारी भागात जास्त आहे. उदा. सावो पावलो, रिओ द जिनिरीओ, ब्राझील मधील उच्चभूमी प्रदेश, अमेझॉन नदीच्या खोऱ्यातील लोकसंख्या कमी असल्याने तेथे नागरीकरण कमी आहे. मात्र तेथिल मॅनॉस या बंदरा ठिकाणीं लोकसंख्या जास्त आहे.